माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : १४८९/२०२२

अपिलार्थी	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी
श्री. अशोक मितारामजी सेलोकर, राजेंद्र वार्ड, शुक्रवारी, हनुमान व्यायाम शाळेजवळ, भंडारा, ता.जि. भंडारा	सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, भंडारा, ता.जि. भंडारा	सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, भंडारा, ता.जि. भंडारा

सुनावणी दिनांक :- १९.१२.२०२४

१. उपस्थिती —

अपिलार्थी	विद्यमान जन माहिती अधिकारी	तत्कालीन जन माहिती अधिकारी	विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी	तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी
अनुपस्थित	उपस्थित	अनुपस्थित	उपस्थित	अनुपस्थित

२. व्दितीय अपील अर्ज —

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०६.०६.२०२२

(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८.०६.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती चूकीची दिल्यामुळे

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

३. माहिती अर्ज —

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०३.०३.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३.०३.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०२० ते आतापर्यंत

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : सुधारीत आश्वासित योजनेच्या नस्तीची प्रत माहिती मागितली आहे.मा. खंड विकास अधिकारी, पं.स. साकोली यांचे पत्र क्र. पंससा/आस्था/५.२/प.स./१८५७/२०२० दि. ०३.११.२०२० अन्वये अशोक गिताराम सेलोक (क्र. आरेखक यांच्या सातव्या वेतन आयोगानुसार (सेवांतर्गत) आश्वासित प्रगती योजनेचा तिसारा लाभ मंजुरी बाबतचा प्रस्ताव आपल्याकडे सादर करण्यात आला त्याअनुषंगाने तयार करण्यात आलेली नस्तीची छायांकित प्रत.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, भंडारा यांनी दि. २८.०३.२०२२ रोजी अपिलार्थी यांना पृष्ठ क्र. १ ते ३० पानांची माहिती प्रदान केली असून अपिलार्थी यांना दि. २९.०३.२०२२ रोजी माहिती मिळाल्याची स्वाक्षरी आहे.

४. प्रथम अपील —

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ३१.०३.२०२२
(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ३१.०३.२०२२
(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : मागितलेली माहिती न देता दुसरीच माहिती दिली.
(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, भंडारा यांनी सुनावणी घेतल्याचे दस्ताऐवज उपलब्ध नाही.

५. युक्तीवाद/लेखी खुलासा — आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असून, विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सा. बां. वि.,जि. प. भंडारा श्री. पी. यु. मिश्रा उपस्थित आहेत. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां. वि. ,जि. प. भंडारा, श्री. व्हि. एस. चुरे उपस्थित आहेत. आज सुनावणी दरम्यान विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याची पोहच सादर केली आहे. सार्वजनिक बांधकाम जिल्हा परिषद, भंडारा , जिल्हा परिषद, भंडारा यांचे कडून पत्र क्र. १३३५/२०२२, दिनांक २८.०३.२०२२ अन्वये माहिती प्राप्त झाली असून सदर संबधाने माझे समाधान झालेले आहे व मी माझी तक्रार मागे घेत आहे,अशी पोहच सादर केली आहे.

६. निष्कर्ष — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरून आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.
अपिलार्थी यांनी सदर प्रकरण मागे घेतल्यामुळे व्दितीय अपिल निकाली काढणे क्रमप्राप्त ठरते.
सबब , खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

उपरोक्त निष्कर्षास अधीन राहून अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक :१९.१२.२०२४
जावक क्रमांक ---1085--- दिनांक --- 7 MAR 2025 ---